पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ 8 /कावि/ 113 /2018
दिनांक- 14 / 3 /2018

**विषय:- महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ:- 1) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/16/2016, दि. 13/01/2016
2) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/77/2016, दि. 01/04/2016
3) परिपत्रक क्र. मातंवि/08/कावि/369/2016, दि. 10/02/2017
4) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/47/2017, दि. 17/04/2017

परिपत्रक,

उपरोक्त संदर्भ क्र. 1 ते 4 अन्वये सर्व विभागांना विभागाशी संबंधित माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत कळविणेत आलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर मनपाचे विविध विभागांशी संबंधित माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, नागरिकांची सनद, विविध योजना, **DPR**, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, **RTI** अंतर्गत प्रसिद्ध करावयाची माहिती इ.) प्रसिद्ध करणेत येते. सदर प्रमाणे माहिती अद्ययावत ठेवणेकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रशिक्षण देऊन विभाग निहाय **Login** व **Password** देणेत आलेले आहेत.

तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त माहिती संबंधित विभागांकडुन वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नसल्यामुळे सन्मा. नगरसदस्य व नागरिक यांच्या तक्रारी येत आहेत. तरी सर्व विभागप्रमुखांनी आपले विभागाची संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवणेकामी संबंधित टेबलचे काम करणा-या कर्मचा-यास सुचना देणेत याव्यात. सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधुन पुनःश्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत दक्षता घेणेत यावी.

तसेच मनपा संकेतस्थळावरील विभाग व विभागप्रमुखांची माहिती ही माहिती व तंत्रज्ञान विभागाकडुन प्रसिद्ध केली जाते. विभागप्रमुखांची बदली / सेवानिवृत्त झालेनंतर नविन विभागप्रमुखांची माहिती (उदा. विभाग प्रमुखांचे नाव, पद, फोटो,संपर्क क्रमांक, **Extension** तसेच कर्मचारी माहिती व तपशिल यांत काही बदल असल्यास इ. ) संबंधित विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठवुन ती वेळोवेळी अद्ययावत करुन घ्यावी

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर **आपले विभागासंबंधी निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, नागरिकांची सनद, विविध योजना, DPR, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, RTI अंतर्गत प्रसिद्ध करावयाची माहिती तसेच विभाग प्रमुखांची माहिती इ. प्रसिद्ध करावयाची माहिती दिनांक 23/03/2018 पर्यंत प्रसिद्ध करणेत यावी.** संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी मुदतीत प्रसिद्ध / अद्ययावत झाली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांचेवर राहिल याची नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका